महाराष्ट्राचा मानबिंदू
लोकमत
पृष्ठे : १०+४ = १४, किंमत : ₹ ४.००
सातारा, बुधवार, दि. ९ जानेवारी २०१९

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

**प्रेक्षकांचा प्रतिसाद :** लोकनृत्यात दहिवडी, समूहगीतात पुसेगावचे कला, वाणिज्य महाविद्यालय प्रथम

# पुसेगावच्या युवा महोत्सवाने जिंकली मने

लोकमत न्यूज नेटवर्क

**सातारा :** सेवागिरी महाराजांच्या ७१ व्या पुण्यस्मरणानिमित्त पुसेगाव यात्रेत येथील देवस्थान ट्रस्टने यावर्षी प्रथमच आयोजित केलेल्या महोत्सवाने सर्वांची मने जिंकली. जिल्हा युवा महोत्सवात दहिवडी कॉलेज दहिवडीच्या कलाकारांनी लोकनृत्यात व समूहगीतात पुसेगावच्या कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या तर विलास झोले-पाटील युवा मंच, येळगावच्या कलाकारांनी पथनाट्यात प्रथम क्रमांकाने बाजी मारली.

दूरदर्शन व केबलच्या वाढत्या प्रभावातही या युवा महोत्सवातील कार्यक्रम पाहण्यासाठी रसिकांनी मोठी गर्दी केली होती. आजची तरुण पिढी रिमिक्सच्या जमान्यात जुनी परंपरा, संस्कृती व लोककलेपासून दूर होत चालल्याची चर्चा सर्वत्र ऐकायला मिळत आहे. मात्र, या युवा महोत्सवात श्री सेवागिरी महाराजांच्या पुसेगाव पुण्यनगरीचे पावित्र्य अबाधित राहिल व मनोरंजनाबरोबरच समाज प्रबोधनाचे काम करण्याच्या दृष्टीने जिल्हातील विविध महाविद्यालयांतील युवा-युवतींनी तसेच खुल्या गटातील कलाकारांनी सादर केलेल्या कलाविष्कारांनी यात्रेकरूंसह रसिक भारावून गेले. महाविद्यालयीन तरुण, तरुणींचा सहभाग असलेल्या युवा महोत्सवाच्या तालावर सेवागिरींची वार्षिक यात्रा चांगलीच थिरकली.

युवा महोत्सवाचे संयोजन समितीचे सचिव प्रा. संजय क्षीरसागर यांनी केले. मोहन गुरव यांनी सूत्रसंचालन केले.



पुसेगाव येथील सेवागिरी यात्रेतील जिल्हा युवा महोत्सवात महाविद्यालयाच्या युवा-युवतींनी कला सादर केली.

- पथनाट्य -विलास झोले-पाटील युवा मंच, येळगाव (प्रथम), अरविंद गवळी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (द्वितीय) तर डी. पी. भोसले कॉलेज कोरेगावने (तिसरा ) प्रबोधन एक सुरुवात ग्रुप सातारा संघाने उत्तेजनार्थ क्रमांक मिळवला
- समूहगीत- कला व वाणिज्य महाविद्यालय पुसेगाव (प्रथम) (द्वितीय) तर डी. पी. भोसले कॉलेज कोरेगाव (द्वितीय), मुधोजी कॉलेज फलटण (तृतीय) क्रमांक तर युवा कलारंग येणपे यांना उत्तेजनार्थ क्रमांक देण्यात आला.
- रेकॉर्ड डान्स- डी. पी. भोसले कॉलेज (प्रथम), डी. पी. भोसले ज्युनिअर कॉलेज कोरेगाव (द्वितीय) तर हिंदवी ग्रुपने तृतीय क्रमांक मिळवला.

## या महोत्सवातील विजेते संघ

लोकनृत्य-दहिवडी कॉलेज दहिवडी (प्रथम). समूहगीत-कला व वाणिज्य महाविद्यालय पुसेगाव (प्रथम ) डी. पी. भोसले कॉलेज कोरेगाव, (द्वितीय ) तर मुधोजी महाविद्यालय फलटणने (तृतीय) तर युवा कला मंच येणपे, श्री हनुमानगिरी ज्युनिअर कॉलेज पुसेगाव संघ उत्तेजनार्थ.



पुसेगाव येथे दहिवडी येथील महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी नृत्य सादर केले.